# 25 ठाणे लोकसभा मतदार संघ

146 ओवळा माजीवडा विधानसभा मतदार संघ, भाईंदर (प.),
महामानव शिव शाहु फुले आंबेडकर स्मृती सभागृह,बेथनी
हॉस्पीटलच्या बाजुला पोखरण रोड न.02 ठाणे(प) 400606
EMAIL ID : 146election2024@gmail.com

जा.क्र./निवडणुक/कावि- 09 /2023-24 दि.04/04/2024

**निवडणुक तात्काळ**

// प्रसिध्दी पत्रक //

25 ठाणे लोकसभा मतदार संघामधील 146 ओवळा माजीवडा वि.म.संघ कार्यक्षेत्रातील मा. सहा. निवडणुक निर्णय अधिकारी श्रीम. शितल देशमुख, नोडल अधिकारी तथा उपायुक्त (शिक्षण), श्रीम. वर्षा दिक्षित यांच्या मार्गदर्शनानुसार 25 ठाणे लोकसभा मतदार संघातील 146 ओवळा माजीवडा वि.म.संघात मिरा भाईंदर महानगर पालिका क्षेत्रात दि.03/04/2024 रोजी अभिनव कॉलेज ऑफ इंजिनियरींग , गोडदेव गांव, भाईंदर पुर्व येथे दुपारी 1.00 वाजता स्वीप (sveep) अंतर्गत जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

अभिनव विदयामंदिर कॉलेजचे प्रिन्सीपल डॉ.आल्वीन मेन्जेस सर यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अतिरीक्त आयुक्त श्री. अनिकेत मानोरकर , नोडल अधिकारी श्री. सुनील यादव व स्वीप पथक प्रमुख कैलास शेवंते व कर्मचारी यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. तर प्रॉफिसर श्री. भगत सर यांनी प्रस्ताविक करुन जास्तीत जास्त 18 वर्ष पुर्ण झालेल्या विदयार्थ्यांनी मतदार नोंदणी करुन मतदान करावे असे सांगितले. तसेच मुलांना इंग्रजीतुन मतदार नोंदणी व मतदान जनजागृती संबधित थोडक्यात माहीती दिली व आपला मताधिकार बजवावा असे आवाहन केले.

146 ओवळा माजिवडा वि.म.स. स्वीप पथकाचे नोडल अधिकारी श्री. सुनिल यादव यांनी मा. भारत निवडणुक आयोगाच्या आदेशान्वये सदरचा कार्यक्रम स्वीप(sveep) पथकामार्फत राबविला जात असुन दि.20/05/2024 सोमवार या दिवशी मतदान असल्याने कुठेही फिरायला न जाता सर्व विदयार्थ्यांनी मतदार यादीत नाव असलेल्या आपल्या कुटुंबियास (आई,वडील,भाउ,बहीण,मित्र व शेजारी) मतदान करण्यास प्रोत्साहीत करावे .असे आवाहन केले

तदनंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अतिरीक्त आयुक्त श्री. अनिकेत मानोरकर यांनी मतदार नोंदणीची प्रक्रीया दि.03/04/2024 रोजी पर्यंत सुरु आहे राज्य निवडणुक आयोगाच्या पोर्टल वर जावुन online नोंदणी करावी. 7 दिवसात तुमचे नांव मतदार यादीत समाविष्ट होईल व तुम्हाला मतदानाचा अधिकार प्राप्त होईल. त्यामुळे वेळ न घालवता जास्तीत विदयार्थ्यांनी आपले नांव आजच राज्य निवडणुक आयोगाच्या nvsp.in या किंवा voter helpline या संकेतस्थळावर जावुन तपासावे नाव नसल्यास online मतदार नोंदणी करावी किंवा 6 नंबरचा अर्ज भरुन नजिकच्या प्रभाग कार्यालयात cfc केंद्रात जमा करावेत असे आवाहन केले.

सदर कार्यक्रमास मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अतिरीक्त आयुक्त श्री. अनिकेत मानोरकर, नोडल अधिकारी श्री. सुनिल यादव, अभिनव विदयामंदिर कॉलेजचे प्रिन्सीपल डॉ.आल्वीन मेन्जेस ,प्रॉफिसर श्री. भगत सर व शिक्षक वृंद, पथक प्रमुख श्री.कैलास शेवंतेव कर्मचारी वर्ग तसेच इंजिनियरींग कॉलेजचे विदयार्थी मोठया प्रमाणात उपस्थीत होते.

कार्यक्रमाच्या शेवटी विदयार्थ्यांनी मतदार नोंदणी करुन दि.20/05/2024 रोजी मतदान करावे यासाठी त्यांना मतदान करण्याची शपथ देण्यात आली अभिनव विदयामंदिर कॉलेजचे प्रिन्सीपल डॉ.आल्वीन मेन्जेस ,प्रॉफिसर श्री. भगत सर व शिक्षक वृंद यांनी केलेल्या सहकार्या बददल नोडल अधिकारी श्री.सुनिल यादव यांनी आभार व्यक्त केले.

4/4/2024

(सुनील ग. यादव)

सहा.आयुक्त तथा नोडल अधिकारी

146 ओवळा माजीवडा वि.म.स.